yog/note/15

# मुंबई विद्यापीठ

क्र.युजी/आयसीडी/२०१६/१४३
मुंबई ४०० ०३२
8 मार्च २०१६

परिपत्रक

संचालक
दुर व मुक्त अध्ययन संस्था
डॉ. शंकर दयाल शर्मा भवन,
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, सांताक्रुझ,
मुंबई - ४०० ०९८.

दूर व मुक्त अध्ययन संस्था यांना असे सुचित करण्यात येते की, विद्वत परिषदेच्या दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी बाब क्र. ७.१ नुसार पारित झालेल्या ठरावास व्यवस्थापन परिषदेच्या दि. ३० डिसेंबर, २०१५ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र. ४ अन्वये मान्यता मिळाली त्यानुसार कला व वाणिज्य अभ्यासक्रमास शैक्षिणिक वर्ष २०१६-१७ पासून अंतर्गत मुल्यमापन २०% आणि वर्षात/ सत्रांत विद्यापीठीय परीक्षा ८०% गुणांकरिता राबविण्यात येत आहे.

सर्व विषयांच्या सर्व व्याख्यानांसाठी (ऑन-लाईन वा पीसीपी सेंटर्समध्ये) नियमित उपस्थिती ही विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे. निरंतर मूल्यमापाची गरज म्हणून MOOC मॉडेलनुसार प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी विद्यार्थ्यांना व्यक्तिगत वा गटांनी करण्यासाठी इष्ट असे उपक्रम (Extra reading, data collection,defining /analyzing solution, creating presentation,quizzes, on-line test etc.,) दिले जातील. त्याचे सबमिशन आणि त्यावरील चर्चा फोन वा इंटरनेटच्या माध्यमातून होईल. खास कारणास्तव पूर्वपरवानगीने व्याख्यानास अनुपस्थिती झाल्यास विद्यार्थ्याने ते व्याख्यान अथवा त्यामध्ये वापरलेले ऑडीओ व्हिज्युअल स्टडी मटेरिअल डाउनलोड करुन तातडीने त्या टॉपिकचा अभ्यास करणे आणि त्या व्याख्यानासंदर्भातील पुढील चर्चेत भाग घेणे आवश्यक आहे. अशा सहभागाचे मूल्यमापन करुन विषय शिक्षकाने विद्यार्थ्याला त्या विषयाला असलेल्या गुणांच्या २०% पैकी अंतर्गत मूल्यमापनाचे गुण देण्यात येतील.

8/3/16
कुलसचिव